दाखल तारीख – ०६.०८.२०१८

नोंदणी तारीख – ०६.०८.२०१८

निकाल तारीख – १७.०७.२०२६

कालावधी –०७ व. ११ म.११ दि.

**कुडाळ येथील सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), कुडाळ यांचे न्यायालयात**

**ता. कुडाळ, जिल्हा– सिंधुदुर्ग.**

( पिठासीन अधिकारी – न. अ. बकरे )

**नियमित दिवाणी दावा नं.९८/२०१८**

**निशाणी क्र.– ५४**

| | | |
|---|---|---|
| १. **श्री. मंगेश धोंडू वाडयेकर,** | } | |
| वय– ४७ वर्षे, धंदा– शेती व मोलमजुरी, | } | ... वादी |
| रा. कवठी, बांदेकरवाडी, | } | |
| ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. | } | |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १. **श्री. विद्याधर धोंडू वाडयेकर,** | } | |
| वय– ४७ वर्षे, धंदा– नोकरी, | } | |
| रा. जगदिशभाई चाळ, रुम नं.५, | } | |
| वरकुंड मोठा फलीया, आकाशवाणी केंद्र, | } | |
| श्रीनाथजी स्कूल, दमण रोड, | } | ...प्रतिवादी |
| नानी दमण, बाफी (प.). | } | |
| २. **श्री. राघो धोंडू वाडयेकर,** | } | |
| वय– ५२ वर्षे, धंदा– शेती, | } | |
| ३. **श्रीम. मंदाकिनी धोंडू वाडयेकर,** | } | |
| वय– ६० वर्षे, धंदा– घरकाम, | } | |
| ४. **श्री. महेश दिगंबर वाडयेकर,** | } | |
| वय– ५७ वर्षे, धंदा– शेती, | } | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | **श्रीम. स्वाती दिगंबर वाडयेकर,** | } | |
| | वय– ३० वर्षे, धंदा– गृहिणी, | } | |
| ६. | **श्रीम. सुनिता दिगंबर वाडयेकर,** | } | |
| | वय– ७५ वर्षे, धंदा– गृहिणी, | } | ...प्रतिवादी |
| ७. | **श्री. उमेश दिगंबर वाडयेकर,** | } | |
| | वय– ४५ वर्षे, धंदा– नोकरी, | } | |
| | प्रतिवादी क्र.२ ते ७ सर्वजण | } | |
| | राहणार कवठी, बंदरवाडी, | } | |
| | ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. | } | |

---

**– दावाः– वाटपाकरीता.**

---

| | |
|---|---|
| वादीतर्फे वकिल | – श्री. एस. जी. मळगांवकर |
| **प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील** | **– श्री. एस. जी. मळगांवकर** |
| **प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे वकील** | **– श्री. डी. डी. नेवगी** |
| **प्रतिवादी क्र.४ ते ७ विरुध्द** | **– दावा एकतर्फा** |

---

**–::–न्यायनिर्णय–::–**

**(घोषणा तारीख– १७ जुलै, २०२६)**

प्रस्तुतचा दावा वादीने वाटपाकरीता दाखल केला असुन, त्यामध्ये त्यांनी दावा मिळकतीचे वाटप होऊन त्याचा पृथक कब्जा मिळणेची विनंती केलेली आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन –**

२. गांव मौजे कवठी, ता. कुडाळ येथील जमिन मिळकतीचे सर्व्हेवर्णनादी तपशील पुढीलप्रमाणे–

**'अ' मिळकत**

| अ.नं. | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १. | ५६६ | – | ०–०२–० | ०–०२ |
| २. | ५७६ | – | ०–०३–०<br>पो.ख.०–०१–० | ०–०२ |
| ३. | ५८० | – | ०–११–०<br>पो.ख.०–०३–० | ०–०६ |
| ४. | ४७५ | – | ०–०६–६०<br>पो.ख.०–००–५० | ०–७२ |
| ५. | ४७९ | – | ०–०७–३० | १–५० |
| ६. | ४८९ | – | १–८३–१०<br>पो.ख.०–५९–८० | ३–२५ |
| ७. | ४९५ | – | ०–५१–५०<br>पो.ख.०–२९–२० | २–३३ |

गांव मौजे कवठी, ता. कुडाळ येथील जमिन मिळकतीचे सर्व्हे वर्णनादी तपशील खालीलप्रमाणे.

**'ब' मिळकत**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ४४२ | – | ०–०४–३०<br>पो.ख.०–०१–५० | ०–१९ |

गांव मौजे गांधीग्राम, ता. कुडाळ, येथील जमिन मिळकतीचे सर्व्हेवर्णनादी तपशील खालीलप्रमाणे.

'क' मिळकत

| अ.नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | २८ | १० | ०-०१-८० | ०-२५ |
| २ | २८ | १३ | ०-०९-१० | १-३७ |

३. वर नमुद केल्याप्रमाणे मिळकती या प्रस्तुत दाव्याचा वाद विषय असुन, त्यांना यापुढे संक्षिप्तरित्या 'दावा मिळकती' असे संबोधण्यात येते.

४. वादी यांचे कथनाप्रमाणे, सदरची दावा मिळकत ही वादीचे आजोबा राघो धोंडू वाडयेकर यांच्या कुळपणाची मिळकत होती. त्यानंतर वादीचे वडील धोंडू राघो वाडयेकर यांच्या नावाची नोंद वारस म्हणून फेरफार नं.६१८ व वारस रजिस्टर नं.१० ने दाखल झाली आहेत. त्यामुळे सदर दावा मिळकतीमध्ये धोंडू राघो वाडयेकर यांचे मृत्यूपश्चात वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ अशी चार मुले असल्याने त्यांना दावा मिळकतीमध्ये समान १/४ (पाव हिस्सा) दावा मिळकतीमध्ये वारसाहक्काने प्राप्त झालेला आहे. सदर दावा मिळकतीमध्ये धोंडू राघो वाडयेकर यांचे मृत्यूपश्चात वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची नावे फेरफार नं.१३२३ व वारस रजिस्टर नं.१११ ने वारस म्हणून दाखल झालेली आहेत. त्यानंतर वादी यांची आई मनोरमा धोंडू वाडयेकर मयत झाल्यानंतर वारसहक्काने वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची नावे फेरफार नं.३४७ व वारस रजिस्टर नं.१८४ ने दाखल झाली आहेत. अशाप्रकारे सदर दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना प्रत्येकी १/४ हिस्सा प्राप्त झालेला आहे.

**<u>वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची वंशावळ पुढीलप्रमाणे–</u>**

राघो धोंडू वाडयेकर (आजोबा)

धोंडू राघो वाडयेकर (वडील)

मनोरमा धोंडू वाडयेकर (आई)

**मंगेश** **विद्याधर** **राघो** **मंदाकिनी**

५. वादी यांचे कथनाप्रमाणे, सदर दावाविषयक अ व क मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा खालीलप्रमाणे हिस्सा आहे.

अ. वादी यांचा १/४ एवढा हिस्सा आहे.

ब. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/४ एवढा हिस्सा आहे.

तसेच सदर दावाविषयक ब मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा खालीलप्रमाणे हिस्सा आहे.

अ. वादी यांचा १/८ एवढा हिस्सा आहे.

ब. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/८ एवढा हिस्सा आहे.

क. प्रतिवादी क्र.४ ते ७ यांचा एकत्रात १/२ एवढा हिस्सा आहे.

६. सदरच्या दावाविषयक मिळकती या वादीस विकसीत करावयाच्या असल्याने वादी हे प्रतिवादी क्र.२ यांचेकडे संमती मागण्यास दि.५ जून २०१८ रोजी गेले असता, "मिळकती सामाईक आहेत, मी संमती देणार नाही तसेच वाटप सुध्दा करुन देणार नाही." असे सांगून वाटप करण्यास नकार दिला. त्यावेळी सदर दावाविषयक मिळकतीचे वाटप करुन देण्यास नकार देऊन "तुमचा सदरच्या दावाविषयक मिळकतीमध्ये काहीही हक्क नसून, तुमचा व आपला कोणताही नातेसंबंध नाही. मग तुम्ही कोर्ट कचेरी करत राहा." अशी धमकी देऊन वाटप करण्यास नकार

दिला. त्यामुळे वादी यांना सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

७. प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्र.३७ कडे आपली कबुली कैफियत दाखल केली असुन, प्रतिवादी क्र.२ व ३ ने मुदतीत कैफियत दिली नसलेने पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.२६.०३.२०१९ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन त्यांचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविणेत येत आहे असा आदेश पारीत केलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.४ ते ७ यांना दाव्याचे समन्स लागून देखील ते हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.२५.०७.२०२३ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश करुन दावा एकतर्फा चालविणेत आलेला आहे.

८. वादी यांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांची कथने विचारात घेऊन पुढीलप्रमाणे मुद्दे नोंद केलेले असुन, त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

**मुद्दे –**

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी शाबीत करतात का, दावा मिळकत अ व क मिळकतीमध्ये त्यांचा १/४ व ब मिळकतीमध्ये १/८ इतका हिस्सा आहे? | **होय** |
| २. | वादी त्यांच्या मागणीप्रमाणे, दावा मिळकत अ मधील गट नं.४९५ ही मिळकत त्यांच्या एकट्याच्या वाटपात मिळणेस पात्र आहेत का? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ३. | वादी त्यांच्या मागणीप्रमाणे दावा मिळकतीचे वाटप होवून पृथ्थक कब्जा मिळणेस पात्र आहेत का? | **अंशतः होय** |
| ४. | काय आदेश व हुकुमनामा? | **अंतिम आदेशाप्रमाणे दावा अंशतः मंजुर करणेत येत आहे.** |

–::– **कारणमिमांसा** –::–

९. वादी यांनी आपल्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ खालीलप्रमाणे पुरावा सादर केला आहे.

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | गाव मौजे कवठी येथील गट नं.५६६ चा सातबारा उतारा | ६ |
| २. | गाव मौजे कवठी येथील गट नं.५७६ चा सातबारा उतारा | ७ |
| ३. | गाव मौजे कवठी येथील गट नं.५८० चा सातबारा उतारा | ८ |
| ४. | गाव मौजे कवठी येथील गट नं.४७५ चा सातबारा उतारा | ९ |
| ५. | गाव मौजे कवठी येथील गट नं.४७९ चा सातबारा उतारा | १० |
| ६. | गाव मौजे कवठी येथील गट नं.४८९ चा सातबारा उतारा | ११ |
| ७. | गाव मौजे कवठी येथील गट नं.४९५ चा सातबारा उतारा | १२ |
| ८. | गाव मौजे कवठी येथील गट नं.४४२ चा सातबारा उतारा | १३ |
| ९. | गाव मौजे गांधीग्राम येथील गट नं.२८/१० चा सातबारा उतारा | १४ |
| १०. | गांव मौजे गांधीग्राम येथील गट नं.२८/१३ चा सातबारा उतारा | १५ |
| ११. | गांव मौजे कवठी येथील फेरफार क्र.१३२३ चा उतारा | १६ |
| १२. | गाव मौजे कवठी येथील गट नं.४६९ चा सातबारा उतारा | १७ |
| १३. | गाव मौजे कवठी येथील गट नं.४७४ चा सातबारा उतारा | १८ |

| | | |
|---|---|---|
| १४. | गाव मौजे कवठी येथील गट नं.५६५ चा सातबारा उतारा | १९ |
| १५. | गाव मौजे कवठी येथील गट नं.५७० चा सातबारा उतारा | २० |
| १६. | वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र | ४७ |
| १७. | वादीतर्फे पुरावा बंद पुरशिस | ४८ |

**मुद्दा क्र.१ ते ३ करिताः–**

**१०.** वरील सर्व मुद्दे हे परस्परांशी संबंधीत व सलग्न असल्याने पुराव्यांची व कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता एकत्रीत विचारात घेण्यात आलेले आहेत.

**११.** वादीच्या कथनाप्रमाणे, सदरच्या दावा विषयक मिळकती या वादीस विकसित करावयाच्या असल्याने वादी प्रतिवादी क्र.२ यांचेकडे संमती मागण्यास दि.५ जून २०१८ रोजी गेली असता, 'मिळकती सामाईक आहेत, मी संमती देणार नाही, तसेच वाटप सुध्दा करुन देणार नाही.' असे सांगून त्यांनी वाटप करण्यास नकार दिला. तसेच 'तुमचा सदर दावा विषयक मिळकतीत काहीही हक्क नसून, तुमचा व आपला कोणताही नातेसंबंध नाही. मग तुम्ही कोर्ट–कचेरी करत रहा.' अशी वादींना धमकी दिली. तसेच दावा मिळकतींपैकी गट नं.४९५ ही मिळकत वादी यांच्या एकट्याच्याच वहिवाटीत व ताब्यात असून, सदर मिळकतीमध्ये वादी यांचे राहते घर नं.५०४ आहे. तसेच सदर दावा मिळकतीमध्ये वादी यांनी माड, सुपारी, साग, फणस, आंबा, जांभूळ, काजू, अशी विविध प्रकाराच्या झाडांची लागवड केलेली आहे. त्यामुळे सदर गट नं.४९५ हे वादी यांच्या एकट्याच्याच वाटपात टाकण्याचा आदेश होण्याकरीता वादींना सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

**१२.** वादीने दावा मिळकतीतील सामाईक हिस्सा त्यांच्या नावे असलेल्या क्षेत्राप्रमाणे

वाटप होऊन मिळणेकरीता मागणी केली आहे. सदर मिळकतीतील इतर सहभागदार यांना वादीने पक्षकार म्हणून सामील केलेले आहे. त्यापैकी प्रतिवादी क्र.१ यांनी आपले म्हणणे दाखल करुन दावा मान्य व कबूल केलेले आहे. तसेच, प्रतिवादी क्र.२ व ३ ने मुदतीत कैफियत दिली नसलेने पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.२६.०३.२०१९ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन त्यांचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविणेत येत आहे, असा आदेश पारीत केलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.४ ते ७ यांना दाव्याचे समन्स लागून देखील ते हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.२५.०७.२०२३ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश करुन दावा एकतर्फा चालविणेत आलेला आहे. त्यामुळे वादींचा पुरावा विनाआव्हानित राहिलेला आहे. मुळात वादीची कथने प्रतिवादी यांनी कोणत्याही पुराव्याने किंवा आपल्या कैफियतीद्वारे नाकारलेली नाहीत. सदरची दावा मिळकत ही मुळ वादीचे आजोबा राघो धोंडू वाडयेकर यांच्या कुळपणाची मिळकत होती. त्यांचे मृत्यूनंतर वादींचे वडील धोंडू राघो वाडयेकर यांच्या नावाची नोंद म्हणून फेरफार क्र.६१८ व वारस रजिस्टर नं.१० ने दाखल झाली आहेत व सदर दावा मिळकतीमध्ये धोंडू राघो वाडयेकर यांचे मृत्यूपश्चात वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ या त्यांच्या मुलांना दावा मिळकतीमध्ये वारसाहक्काने समान १/४ (पाव हिस्सा) प्राप्त झालेला आहे. धोंडू राघो वाडयेकर यांचे मृत्यूनतर वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची नावे वारसाहक्काने फेरफार नं.१३२३ व वारस रजिस्टर नं.१११ ने दाखल झालेली आहेत. त्यानंतर वादी यांची आई मनोरमा धोंडू वाडयेकर यांचे मृत्यूपश्चात वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची नावे फेरफार क्र.३४७ व वारस रजिस्टर क्र.१८४ ने दाखल झाली आहेत. वादीने निशाणी क्र.१६ येथे फेरफार क्र.१३२३ दाखल केला आहे. सदर फेरफार क्र.१३२३ चे अवलोकन केले असता, सदर

फेरफार क्र.१३२३ वर वादी व प्रतिवादी यांच्या नावाची नोंद असल्याची दिसुन येते. याचाच अर्थ वादीने कथन केल्याप्रमाणे, त्यांचा दावा मिळकत अ व क मिळकतीत १/४ एवढा हिस्सा व ब मिळकतीत १/८ एवढा हिस्सा असल्याची बाब शाबीत केलेली आहे. उपरोक्त ७/१२ वरील नोंदीवरुन वादी व प्रतिवादी यांची नावे सहहिस्सेदार म्हणून भोगवटादारसदरी नमुद असल्याचे स्पष्ट होते.

१३. प्रस्तुतकामी वादी यांनी केलेले कथन प्रतिवादी क्र.१ यांनी कैफियत देऊन दावा मान्य व कबुल केला असल्याने तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ ने मुदतीत कैफियत दिली नसलेने त्यांचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविणेत आलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.४ ते ७ यांना दाव्याचे समन्स लागून देखील ते हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविणेत आलेला आहे. वादींच्या मागणीप्रमाणे दावा मंजुर केलेस कोणाचेही नुकसान होताना दिसून येत नाही. वादीने दावा मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावरील नमुद क्षेत्रांपैकी तसेच सदर सर्व्हे नंबरच्या उताऱ्यावरील नोंदी पाहता, वादीच्या मागणीप्रामणे वाटप होऊन मिळणेस कोणतीही हरकत दिसुन येत नाही. तसेच दावा मिळकतींपैकी गट नं.४९५ या मिळकतीत वादी यांचे राहते घर नं.५०४ असुन, सदर मिळकत वादी यांच्या एकट्याच्या हिश्श्यात देणेकरीता वादी यांनी मागणी केली आहे. गट नं.४९५ चे अवलोकन केले असता, वादी व्यतिरीक्त प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची नावे नमुद असल्याचे दिसून येते. सबब, अशापरिस्थितीत सदरची मिळकत वादी यांच्या एकट्याच्या मालकी हक्कात देणे योग्य होणार नाही. सबब, मिळकत गट क्र.४९५ मध्ये वादी यांना १/४ इतका हिस्सा देणे योग्य होईल. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर **होकारार्थी**, मुद्दा क्र. २ चे उत्तर **नकारार्थी** व मुद्दा क्र.३ चे उत्तर **अंशतः होकारार्थी** नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीताः–**

**१४.** मुद्दा क्र.४ चे निष्कर्षाकरिता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** दावा अंशतः मंजुर करणेत येतो.

**२.** वादी यांचा गांव मौजे कवठी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील दावा मिळकत 'अ' मिळकतीमध्ये गट क्र.५६६, ५७६, ५८०, ४७५, ४७९, ४८९, ४९५ मध्ये १/४ व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/४ इतक्या क्षेत्राचा हिस्सा असल्याचे जाहीर करणेत येते.

**३.** वादी यांचा गांव मौजे कवठी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील दावा मिळकत 'ब' मिळकतीमध्ये सर्व्हे नं.४४२ मध्ये १/८ व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/८ व प्रतिवादी क्र.४ ते ७ यांचा एकत्रात १/२ इतक्या क्षेत्राचा हिस्सा असल्याचे जाहीर करणेत येते.

**४.** वादी यांचा गांव मौजे कवठी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील दावा मिळकत 'क' मिळकतीमध्ये सर्व्हेन नं.२८, हिस्सा नं.१० व सर्व्हे नं.२८ हिस्सा नं.१३ मध्ये १/४ व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/४ इतक्या क्षेत्राचा हिस्सा असल्याचे जाहीर करणेत येते.

**५.** दावा मिळकत शेतजमीन असल्याने दावा मिळकतीचे वाटप करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ सह आदेश २०, नियम १८ अन्वये हुकुमनामा जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस यांचेकडे पाठविणेत यावा.

**६.** येणेप्रमाणे प्राथमिक हुकुमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

दिनांक– १७.०७.२०२६.
ठिकाणः– कुडाळ

[ न. अ. बकरे ]
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. filed judgment/order are same word to word, as per the original judgment/order.

Name of the Stenographer : V.B.Gurav (Grade-3)

Court Name : Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Kudal.

Judgment/order signed by the P.O.on :17-07-2026

Judgment/order uploaded on :17-07-2026